# कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ,सातारा

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

## (घटक महाविद्यालय)

## विद्यार्थिनी वसतिगृह समिती वार्षिक अहवाल २०२४-२५

- सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये कमवा व शिका योजनेच्या २७ व पेइंगच्या १७५ अशा २०२ विद्यार्थीनींनी प्रवेश घेतला.
- दिनांक ०५ ऑक्टोबर २०२४ रोजी मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्या संकल्पनेतून शारदशक्ती व्याख्यानमाले अंतर्गत विद्यार्थिनी वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी श्रीमती नजराणा मुल्ला यांचे 'पौगंडावस्थेतील मानसिक आरोग्य' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले, याप्रसंगी श्रीमती नूतन नांगरे कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.
- दिनांक ०६ ऑक्टोबर २०२४ रोजी डॉ. मोहिनी साळुंखे यांचे 'स्त्रियांचे आरोग्य आणि आहार' या विषयावर विद्यार्थिनींसाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले, याप्रसंगी रेक्टर श्रीमती जुई ढवळे कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.
- दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी श्रीमती अदिती चव्हाण यांचे 'सायबर सेक्युरीटी' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले, याप्रसंगी डॉ. शामला माने कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.
- दिनांक ०८ ऑक्टोबर २०२४ रोजी डॉ. अर्चना महाडिक यांचे 'महिलांची जीवनशैली व आरोग्य' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले, याप्रसंगी डॉ. प्रियांका जगदाळे कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.
- दिनांक ०९ ऑक्टोबर २०२४ रोजी आहारतज्ज्ञ श्रीमती तेजस्विता आफळे यांचे 'किशोरवयीन मुलींचा आहार आणि आरोग्य' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले, याप्रसंगी प्रा. डॉ. जयश्री आफळे कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.
- दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी श्रीमती कीर्ती साळुंखे यांचे 'समाजमाध्यमांचे समाजावरील परिणाम' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले, याप्रसंगी प्रा. सौ. छाया सकटे कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.
- दिनांक १८ ऑक्टोबर २०२४ रोजी नवरात्रोत्सवानिमित्ताने वसतिगृहातील विद्यार्थिनीसाठी दांडिया/गरबा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

- दिनांक ०३ डिसेंबर २०२४ रोजी उजास फौंडेशन, सातारा यांचे वतीने विद्यार्थिनी वसतिगृहातील विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप करण्यात आले. यासाठी श्रीमती राजश्री चिंचकर यांचे विशेष सहकार्य लाभले.
- दिनांक २४ व २५ जानेवारी २०२५ रोजी होस्टेल डे निमित्ताने विद्यार्थिनींसाठी क्रिकेट स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा, रस्सीखेच स्पर्धा, लिंबू-चमचा स्पर्धा, बटाटा रेस स्पर्धा, चीट गेम व प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.
- दिनांक २६ जानेवारी,२०२५ रोजी विद्यार्थिनी वसतिगृह येथे होस्टेल डे निमित्त विविध कलागुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब यांच्या मौलिक मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के साहेब तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब उपस्थित होते. या कार्यक्रमाचे परिक्षण करण्यासाठी परीक्षक म्हणून डॉ. सौ. पी. के. घाटगे, डॉ. संजयकुमार सरगडे व प्रा. माधवी गोडसे यांनी कामकाज पाहिले. विद्यार्थिनी वसतिगृह प्रमुख व महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रो. (डॉ.) रोशनआरा शेख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रम आयोजनापाठीमागचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थिनी वसतिगृह रेक्टर श्रीमती जुई ढवळे यांनी मागील वर्षीच्या वसतिगृह अहवालाचे वाचन केले. प्रमुख मान्यवरांच्या सत्कार समारंभानंतर प्रमुख पाहुणे मा. कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के साहेब यांनी विद्यार्थिनींना आपल्या विविध कला सादर करण्यासाठी शुभेच्छा दिल्या व मुख्य कार्यक्रमानंतर सर्व सहभागींचे कौतुक करून शाबासकीची थाप दिली. मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना विद्यार्थिनी वसतिगृह समितीच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये विद्यार्थिनींनी सहभाग घेवून आपले व्यक्तिमत्व विकास साधण्याचा शुभसंदेश दिला. विद्यार्थिनी वसतिगृह सदस्या सौ. आसावरी शिंदे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले व त्यानंतर विविध कलागुण सादरीकरणाच्या मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली. शिवाय महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ. अनिलकुमार वावरे, डॉ. रामराजे माने देशमुख, वसतिगृह समितीमधील सदस्य डॉ. व्ही. एम. माने, प्रा. सौ. आसावरी शिंदे, प्रा. सौ. उषा घाडगे यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. राधिका मोहिते व ऐश्वर्या मगर यांनी केले. माजी संस्कृत विभाग प्रमुख डॉ. अराणके मॅडम यांच्या आर्थिक सहकार्यातून वसतिगृहातील विद्यार्थिनींना भोजनाची व्यवस्था करण्यात आली. ‘होस्टेल डे’ कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. चिंदे एम. डी. यांनी कामकाज पाहिले.
- दिनांक ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी विभाग प्रमुख प्रो. (डॉ.) सुभाष वाघमारे यांच्या समन्वयातून व सरकारी महाविद्यालय सांखळी, गोवा येथील मराठी विभागाच्या विद्यार्थिनींनी विद्यार्थिनी वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी नृत्य, नाट्य, संवाद, गायन, कविता वाचन यातून गोव्याच्या संस्कृतीचा साद्यंत आविष्कार घडविला.

- दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी रयत सायन्स सेंटर वर्ये यांच्या वतीने वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी दुर्बिणीच्या सहाय्याने चंद्रदर्शन व आकाश निरीक्षणाच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. सारंग भोला व डॉ. सुभाष कारंडे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.
- दिनांक २९ मार्च ते ०४ एप्रिल २०२५ या कालावधीत रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थिनींना पौष्टीक आहाराचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचा शुभारंभ रयत शिक्षण संस्थेचे आदरणीय चेअरमन श्री. चंद्रकांत दळवी साहेब, सचिव श्री. विकास देशमुख साहेब, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य श्री. रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थिनींना खाऊ वाटप करून करण्यात आला. महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे साहेब यांच्या संकल्पनेतून विद्यार्थिनींच्या एच. बी. वाढीसाठी या सप्ताहात सर्व मुलींना गुळ-शेंगदाणे, बेदाणा, खजूर, राजिगरा लाडू, केळी, शेंगदाणा चिक्की या सकस व पौष्टिक आहाराचे वाटप करण्यात आले.
- विद्यार्थिनी वसतिगृहातील विद्यार्थिनी कु.विनिता लोहार हिची मंत्रालयीन सहाय्यक म्हणून तर कु. पूजा कदम, कु. प्रगती काळे व श्वेता माळवे या विद्यार्थिनीची मुंबई पोलीस दलामध्ये निवड झाली.
- या शैक्षणिक वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. शिवाय विद्यार्थिनी वसतिगृह प्रमुख प्रो. (डॉ.) रोशनआरा शेख व प्रो. (डॉ.) सविता मेनकुदळे, उपप्राचार्य प्रो. (डॉ.) सुभाष वाघमारे, उपप्राचार्य प्रो. (डॉ.) अनिलकुमार वावरे, उपप्राचार्य डॉ. रामराजे माने देशमुख, प्रा. गणेश पाटील उपप्राचार्य (ज्यू.), कार्यालयीन प्रमुख श्री. सपकाळ टी. के. यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यार्थिनी वसतिगृह रेक्टर श्रीमती जुई ढवळे, डॉ. चिंदे एम. डी., विद्यार्थिनी वसतिगृह समितीमधील सदस्य डॉ. व्ही. एम. माने व ज्युनिअर विभागातील प्रा. सौ. आसावरी शिंदे, प्रा. सौ. उषादेवी घाडगे या सर्व सदस्या, विद्यार्थिनी वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनी आणि प्रशासकीय सेवक यांच्या विशेष सहकार्यातून वर्षभरातील वसतिगृहाचे कामकाज यशस्वीरीत्या पूर्ण करता आले.

## विद्यार्थिनी वसतिगृह समिती आयोजित विविध कार्यक्रम फोटो:-२०२४-२५




शारदशक्ती व्याख्यानमालेच्या निमित्ताने आयोजित विशेष व्याख्यानाप्रसंगी विचारमंचावर उपस्थित असलेले रयत शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. विकास देशमुख साहेब, विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रिं. डॉ. ज्ञानदेव म्हस्के, मा.प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे व इतर मान्यवर



‘होस्टेल डे’ निमित्त रस्सीखेच स्पर्धेचे उद्घाटन करताना मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे साहेब,
वसतिगृह प्रमुख प्रो. (डॉ.) रोशनआरा शेख  व इतर मान्यवर



‘विविध कलागुण दर्शन’ कार्यक्रम प्रसंगी मा.कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, मा.प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे व इतर मान्यवर



होस्टेल डे निमित्त आयोजित विविध गुणदर्शन सादरीकरण कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित सर्व विद्यार्थिनी



विद्यार्थिनींना सकस व पौष्टिक आहार वाटप कार्यक्रमाचा शुभारंभ करताना रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. श्री. चंद्रकांत दळवी साहेब, सचिव श्री. विकास देशमुख साहेब, मनेजिंग कौन्सिल सदस्य मा. श्री. रामशेठ ठाकूर  समवेत मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे व विद्यार्थिनी वसतिगृह प्रमुख प्रो. डॉ. सविता मेनकुदळे व इतर मान्यवर